# पुणे जिल्ह्यात हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस

**पुणे (प्रतिनिधी) :** पुणे जिल्ह्यातील बहुतांशी भागात पावसाचा काहीसा जोर वाढला आहे. जिल्ह्यात अनेक ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडला आहे. लोणावळा येथे सर्वाधिक ७८ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. पश्चिम पट्ट्यातील धरणक्षेत्रात पावसाची संततधार चालू होती. त्यामुळे धरणातील पाणीसाठा वाढला आहे.

गेल्या पाच ते सहा दिवसांपासून जिल्ह्याच्या अनेक भागांत पावसाने सुरवात केली आहे. पश्चिम पट्ट्यातील मावळ, मुळशी, भोर, वेल्हा या तालुक्यांतही पावसाने चांगलीच सुरवात केली आहे. त्यामुळे भातपिकांना दिलासा मिळत आहे. मुळशी तालुक्यातील मुठे येथे सर्वाधिक ४६ मिलिमीटर पाऊस पडला. तर पौड १५ मिलिमीटर, घोटावडे २२, मळे २५, पिरंगुट १४ मिलिमीटर पाऊस पडला. भोर तालुक्यातील भोळावडे येथे २२ मिलिमीटर, भोर १०, नसरापूर ३, किकवी ५, वेळू ७, आंबावडे २१, संगमनेर ६, निगुडघर ३० मिलिमीटर पाऊस पडला. मावळ तालुक्यातील लोणावळापाठोपोठा कार्ला येथे ३८ मिलिमीटर, काले ३४, तळेगाव ६, खडकाळा १७, शिवने ६, वेल्हा तालुक्यातील वेल्हा ११, पानशेत २०, विंझर, आंबावणे ६, जुन्नर तालुक्यातील राजूर ६९, आपटाळे ४८, डिंगोरे १२ मिलिमीटर, ओतूर, नारायणगाव येथे हलका पाऊस पडला. खेड तालुक्यातील कुडे येथे २८ मिलिमीटर पाऊस पडला. पाईट येथे दहा मिलिमीटर तर वाडा, राजगुरुनगर, पिंगळगाव, कन्हेरसर, कडूस येथे पावसाच्या अधूनमधून सरी पडल्या.



**वीर : धरणातून तेरा हजार क्युसेकने विसर्ग**

जिल्ह्यात झालेल्या पावसामुळे कळमोडी, चासकमान, वडीवळे, आंध्रा, पवना, पानशेत, मुळशी, पानशेत, वरसगाव, खडकवासला, नीरा देवघर, भाटघर, वीर ही धरणे शंभर टक्के भरली आहेत. तर कासारसाई, टेमघर, गुंजवणी, नाझरे, पिंपळगाव जोगे, माणिकडोह, येडगाव, वडज, डिंभे, घोड, विसापूर ही धरणे ५० टक्क्यांहून अधिक भरली आहे. येत्या काळात चांगला पाऊस झाल्यास ही धरणेही लवकर भरण्याची शक्यता आहे.

**धरणाच्या पाणलोट क्षेत्रात झालेला पाऊस (मिलिमीटरमध्ये) :** पिंपळगाव १६, माणिकडोह ११, चासकमान १२, वडीवळे ४५, आंध्रा १५, पवना ३४, कासारसाई ७, टेमघर २५, चासकमान ४, भामा आसखेड ८, मुळशी २५, टेमघर ४६, वरसगाव १६, पानशेत २०, खडकवासला ५, गुंजवणी ११, नीरा देवघर ११, भाटघर ३.

## संक्षिप्त

### नगर जिल्ह्यातील पावसाची हजेरी

**नगर :** जवळपास महिनाभरापासून गायब झालेल्या पावसाने आज नगर जिल्ह्यातील बहुतांश भागात आज हजेरी लावली. दिवसभर पावसाची रिपरिप सुरू होती. त्यामुळे वाया जाण्याच्या मार्गावर असलेल्या पिकांना दिलासा मिळाला आहे. मात्र, अजूनही जोरदार पावसाची प्रतीक्षा आहे. नगर जिल्ह्यामध्ये यंदाच्या पावसाळ्यात अजूनही जोरदार पाऊस नाही. त्यामुळे खरीप हंगामात यंदा सरासरीएवढीही पेरणी झाली नाही. त्यात गेल्या महिनाभरापासून पाऊस गायब झाला होता. त्यामुळे जवळपास साडेतीन लाख हेक्टर क्षेत्रावरील पिके धोक्यात आली आहेत. मूग, उडदाचे पीक संपल्यात जमा आहेत. मात्र आज गुरुवारी सकाळपासून शहरासह जिल्ह्यात पावसाची रिपरिप सुरू आहे. त्यामुळे वाया जाण्याच्या मार्गावर असलेल्या पिकांना जीवदान मिळाले आहे. मात्र, अजूनही जोरदार पावसाची प्रतीक्षा कायम आहे. रात्री उशिरापर्यंत पावसाची रिपरिप सुरू होती.

### नाशिकला सरासरी ५.५९ मिलिमीटर पाऊस

**नाशिक :** नाशिक जिल्ह्यात पावसाचा जोर कमी झाला आहे. गुरुवारी (ता. १६) सकाळी ८ वाजेपर्यंत झालेल्या नोंदीनुसार जिल्ह्यात एकूण ८३.९ मिलिमीटर तर सरासरी ५.५९ मिलिमीटर पाऊस झाला. नाशिक जिल्ह्यातील निफाड, मालेगाव, सटाणा, सिन्नर, येवला, चांदवड या तालुक्यांत पाऊस नसल्याने खरीप अडचणीत सापडला आहे. गुरुवारी (ता. १६) नाशिक जिल्ह्यात झालेला तालुकानिहाय पाऊस पुढीलप्रमाणे : नाशिक २.९, इगतपुरी ३४, पेठ १३, त्र्यंबकेश्वर १२, नांदगाव १०, कळवण २, सुरगाणा ९.

# धरणातील बेकायदा उपसा रोखण्याचे आदेश

## टंचाईसदृश परिस्थितीमुळे जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश; विहिरींचा विद्युतपुरवठा बंद

**नाशिक (प्रतिनिधी) :** टंचाईसदृश परिस्थिती लक्षात घेता जिल्ह्यातील धरणांमध्ये असलेल्या पाण्याचा बेकायदा उपसा रोखण्याबरोबरच पाणीपुरवठा योजनांची गळती रोखण्याची व विहिरींच्या लगतच्या ५० मीटर अंतरातील सर्व विहिरींच्या पाणी उपसा बंद करण्यासाठी विद्युत पुरवठा खंडित करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.

नाशिक जिल्ह्यातील आठ तालुक्यांत सरासरी ५० टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झाल्यामुळे जिल्ह्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, पेरणी केलेली पिके वाया जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व संबंधित यंत्रणांच्या प्रमुखांची बैठक मंगळवारी घेतली. जिल्ह्यात ९७ टक्के पेरण्या झालेल्या असल्या तरी, सध्या पूर्व भागातील पिकांना पाण्याची गरज आहे. पाऊस न पडल्यास पेरणी वाया जाणार आहे. काही धरणांमध्ये जेमतेम साठा असून, त्यातून पाणीउपसा केला जात असल्याच्या प्रकारावर चर्चा करण्यात आली. धरणातील पाणी पिण्यासाठीच ठेवण्याची पावले उचलावी लागतील ते लक्षात घेता, पाटबंधारे खात्याने पाणी उपसणाऱ्यांवर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्याचबरोबर धरणातून पाणीपुरवठा योजनांसाठी पाणी उचलताना होणारी गळती त्या त्या यंत्रणांची रोखावी, असे आदेश देऊन पाणीपुरवठा योजनांसाठी पाणी साठवण करणाऱ्या विहिरींच्या ५० मीटर परिघात नवीन विहिरी खोदण्यास अनुमती न देताच बोअर घेण्यावर बंदी घालण्याची तसेच जुन्या विहिरी असतील तर त्यांचा विद्युत पुरवठा खंडित करण्याचेही यावेळी ठरविण्यात आले. या बैठकीत सरकारने दुष्काळसदृश परिस्थितीच्या बदललेल्या निकषाची माहिती महसूल, कृषी व गट विकास अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

**ऑगस्टमधील पावसावर भिस्त**

प्रत्येक महिन्यात पडणारा सरासरी पाऊस, झालेल्या पेरण्या व त्यानंतर पिकाची परिस्थिती अशा तीन टप्प्यांत त्याची पाहणी करण्याचे व उत्पादनावर होणाऱ्या परिणामावरच यापुढे दुष्काळ जाहीर केला जाणार असून, त्यासाठी ऑगस्ट महिन्यात पडणाऱ्या पावसावर सारी भिस्त असणार आहे, अशा परिस्थितीत सर्व विभागांनी अचूक माहिती सादर करण्याचे निर्देशही देण्यात आले.

### कोयना धरणातून पाण्याचा विसर्ग वाढवला

**सातारा (प्रतिनिधी) :** कोयना धरण क्षेत्रात पावसाचा जोर कायम असल्याने पाण्याच्या विसर्गात वाढ करण्यात आली आहे. सध्या धरणातून ३५ हजार ९७९ क्युसेक पाण्याचा विसर्ग नदी पात्रात केला जात आहे. गेल्या चार दिवसांपासून कोयना धरण क्षेत्रात पावसाचा जोर वाढल्या धरण व्यवस्थापनाकडून मंगळवारी पाणी सोडण्याचा निर्णय घेण्यात आला. पावसाचा जोर असल्याने धरणाच्या पाणीसाठ्यात मोठ्या प्रमाणात आवक होत असल्याने टप्पाटप्प्याने पाणीसाठ्यात वाढ केली जात आहे. गुरूवारी दुपारी १२ वाजता धरणाचे सहा वक्र दरवाजे चार फुटावर करण्यात आले असून या दरवाज्यातून नदीपात्रात ३३ हजार ८७९ क्युसेक व पायथा वीज गृहातून २१०० असे एकूण ३५ हजार ९७९ क्युसेक पाणी सोडले जात आहे.

सकाळ अॅग्रोवन — आयोजित

महाधन नजर ठेवा उद्यावर — प्रायोजित

सकाळ अॅग्रोवन संवाद

'अॅग्रोवन' साधणार शेतकऱ्यांशी संवाद

कार्यक्रम वेळापत्रक

शनिवार, १८ ऑगस्ट २०१८ रोजी

विषय – उसाचे एकरी शंभर टन उत्पादन

वक्ते – श्री. आशिष गणपुले

(विशेषज्ञ पीक संरक्षण, केव्हीके, कालवडे, जि. सातारा)

श्री. गोरखनाथ डोईफोडे (तालुका कृषी अधिकारी, फलटण)

स्थळ – विविध कार्यकारी सोसायटी, मु.पो. राजाळे, ता. फलटण, जि. सातारा, वेळ – सकाळी ९ वा.

या मार्गदर्शन मेळाव्याचा आपण व आपल्या शेतकरी मित्रांनी अवश्य लाभ घ्यावा, ही विनंती.

# सोलापुरात भीजपाऊस, खरीप पिकांना दिलासा

## जिल्ह्यात सर्वदूर हजेरी; उजनीतील विसर्गही वाढला

**सोलापूर (प्रतिनिधी) :** प्रदीर्घ विश्रांतीनंतर सोलापूर जिल्ह्यात पावसाने गुरुवारी (ता. १६) अखेर दमदार पुनरागमन केले. बुधवारी रात्रीपासूनच जिल्ह्यातील अनेक भागांत भीजपाऊस चांगलाच व्यापला होता. गुरुवारी पहाटे मात्र त्याचा जोर चांगलाच वाढला. दरम्यान, या पावसाने खरिपातील पिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

यंदा जूनच्या सुरवातीला चांगला पाऊस झाला. त्यावरच खरिपाच्या पेरण्या उरकल्या. जिल्ह्याचे खरिपाचे क्षेत्र ७९ हजार हेक्टर निश्चित असताना, यंदा दुप्पट क्षेत्रावर पेरण्या झाल्या. त्यानंतर किरकोळ हजेरी वगळता पावसाने जवळपास दोन महिन्यांहून अधिक काळ पाठ फिरवली आणि खरीप हंगाम धोक्यात आला. गेल्या पंधरवड्यापासून पावसाअभावी पिके माना टाकू लागले होते. पण या पावसाने या पिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. मूग, उडीद आता अंतिम टप्प्यात आहे. पण सोयाबीन, तुरीला याचा चांगला फायदा होणार आहे.

जिल्ह्यातील बार्शी, अक्कलकोट, मोहोळ मंगळवेढा, दक्षिण सोलापूरसह उत्तर सोलापूर तालुक्यांतील काही गावांमध्ये बुधवारी दुपारपासून रिमझिम पाऊस सुरू झाला होता. सायंकाळी त्यात थोडासा वेग वाढला. पण गुरुवारी पहाटे चारच्या सुमारास पावसाने जोरदार हजेरी लावली. दिवसभर पावसाची रिपरिप सुरूच होती. पाऊस पुन्हा सुरू झाल्याने पेरणी झालेल्या क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. तसेच पावसाअभावी रखडलेली कांदा लागवडही आता वेग घेणार आहे.

### 'उजनी'ही ५० टक्क्यांच्या दिशेने

**उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात, तसेच पुणे जिल्ह्यातही पाऊस सुरू झाल्याने उजनीकडे येणारा विसर्ग वाढला आहे. पुणे जिल्ह्यातील काही धरणांमधून अतिरिक्त पाणी पुढे सोडण्यात येत आहे. दुपारी मिळालेल्या माहितीनुसार उजनीत ४१.७५ टक्क्यांवर पोचला आहे. पाण्याची पातळी ४९३.८४० मीटर झाली आहे. एकूण पाणीसाठा २४३६.३० दलघमी इतका झाला आहे. त्यापैकी ६३९.४९ दलघमी इतका उपयुक्त साठा आहे. दौंडकडून २० हजार २३१ क्युसेक विसर्ग सुरू होता. हा विसर्ग असाच प्रवाहित राहिला, तर येत्या चार दिवसांत धरणाचा साठा ५० टक्क्यांवर पोचण्याची शक्यता आहे.**